# 15. सर्वोच्च न्यायालय
## भाग V - कलम 124 ते 147

- **स्वीकृती -** इंग्लंड.
- **भाग V व कलम 124** मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे संघटन, स्वातंत्र्य, अधिकार इत्यादी तरतुदी दिल्या आहेत.
- 1935 च्या कायद्यातील फेडरल कोर्ट ऑफ इंडियाच्या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना 26 जानेवारी, 1950 रोजी करण्यात आली असली तरी प्रत्यक्ष कामकाज 28 जानेवारी, 1950 रोजी सुरु झाले.
- मुख्यालय - दिल्ली.
- पहिले सरन्यायाधीश - न्या. हिरालाल जे. कानिया.
- सध्याचे सरन्यायाधीश - न्या.यशवंत धनंजय चंद्रचुड (50 वे सर न्यायाधीश,
- सर्वोच्च न्यायालयाची पहिली महिला न्यायाधीश - मिरासाहेब फातिमाबेबी
- **कलम 124** - सर्वोच्च न्यायालयाचे संघटन व रचना.
- **कलम 124(1)** - भारताचे एक सर्वोच्च न्यायालय असेल. त्यामध्ये एक सरन्यायाधीश व संसद ठरवील इतके इतर न्यायाधीश असतील. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेवेळी म्हणजेच 1950 मध्ये ही संख्या 1+7 = 8 एवढी होती नंतर -

  1956 - 10+1 = 11, 1960 - 13+1 = 14,
  1977 - 17+1 = 18, 1986 - 25+1 = 26,
  2008 - 30+1 = 31, 2019 - 33+1 = 34
- **कलम 124(2) -** न्यायाधीशांची नेमणुक राष्ट्रपती सहीनिशी व स्वमुद्रांतील अधिपत्राद्वारे करतील.

1) **सरन्यायाधीश** - राष्ट्रपती सरन्यायाधीशाची नेमणुक सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या आवश्यक वाटतील इतक्या न्यायाधीशांशी सल्ला मसलत करुन नेमणुक करतील.
2) **इतर न्यायाधीश** - राष्ट्रपती सरन्यायाधीश सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या विचार घेवून किंवा सल्ला मसलत करुन इतर न्यायाधीशांची नेमणुक करतील.

- **विचार घेण्याबाबतचा विवाद -**

  **पहिला न्यायाधीशाचा खटला 1982 -** विचार घेणे म्हणजे एकमत होणे नसून केवळ मतांचे आदान-प्रदान.

  **दुसरा न्यायाधीश खटला 1993 -** विचार घेणे म्हणजे एकमत होणे, सरन्यायाधीशांचा सल्ला घेणे राष्ट्रपतीवर बंधनकारक.

  **तिसरा न्यायाधीश खटला 1998 -** राष्ट्रपतींना न्यायाधीशांच्या

नियुक्तीबाबत सरन्यायाधीशांना सल्ला देताना चार ज्येष्ठ न्यायाधीशांचा सल्ला घेणे बंधनकारक.

**चौथा न्यायाधीश खटला 2015 -** संविधानातील 99 वी घटनादुरुस्ती राष्ट्रीय नियुक्ती आयोग स्थापना करण्याची शिफारस.

- **कलम 124(3)** - न्यायाधीशांची पात्रता.
  भारताचा नागरिक, उच्च न्यायालयात 5 वर्षे न्यायाधीश किंवा 10 वर्षेस सलग वकिली केलेला असावा किंवा राष्ट्रपतींच्या मते निष्णात कायदेपंडित असावा.
- **कलम 124(4) -** न्यायाधीशांना पदावरुन दूर करणे. न्यायाधीशांचे गैरवर्तन अकार्यक्षमता या कारणास्तव संसदेमध्ये ठराव सादर करुन दोन्हीही सभागृहाने विशेष बहुमताने ठराव मंजूर केल्यानंतर राष्ट्रपतीच्या आदेशाने त्यांना पदावरुन दूर केले जाते.
- **कलम 124(5) -** न्यायाधीशांना पदावरुन दूर करण्याचा प्रस्ताव लोकसभेत 100 आणि राज्यसभेच्या 50 सदस्यांनी सहीनिशी लेखी निवेदन अध्यक्ष/सभापतीकडे सादर करणे गरजेचे असते.
- **कलम 124(6)** - सर न्यायाधीश व इतर न्यायाधीशांना राष्ट्रपती परिशिष्ठ 3 मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे पद आणि गोपनियतेची शपथ देतील.
- **कलम 124(7) -** सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश व इतर न्यायाधीशांना निवृत्तीनंतर वकीली करण्यास बंदी असेल.
- **कलम 125 -** संसदीय कायद्याद्वारे वेळोवेळी सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश व इतर न्यायाधीश यांचे वेतन व भत्ते निश्चित करण्यात येईल.
- **कलम 126** - सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश हे पद रिक्त असेल तर हंगामी सरन्यायाधीशाची नेमणुक राष्ट्रपती करतील.
- **कलम 127 -** सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीने व उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीशांचा विचार घेवून उच्च न्यायालयातील एखाद्या न्यायाधीशाची हंगामी न्यायाधीश म्हणुन नेमणुक करतील.
- **कलम 128 -** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश राष्ट्रपतींच्या संमतीने सर्वोच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशांची तात्पुरत्या कालावधीसाठी न्यायाधीश म्हणुन नेमणूक करतील.
- **कलम 129 -** सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असेल कारण न्यायालयाच्या अवमानाबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार असेल.
- **कलम 130** - राष्ट्रपतींच्या संमतीने भारताचे सरन्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाचे ठिकाण किंवा कार्यस्थान एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करु शकतील.
- **कलम 131 -** सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र.
- **कलम 132 -** सर्वोच्च न्यायालयाचे पुर्नविचाराचे अधिकार क्षेत्र. (उच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत.)
- **कलम 133** - सर्वोच्च न्यायालयाचे पुर्नविचाराचे अधिकार क्षेत्र. (उच्च न्यायालयाच्या दिवाणी खटल्याबाबत.)
- **कलम 134** - सर्वोच्च न्यायालयाचे पुर्नविचाराचे अधिकार क्षेत्र. (उच्च न्यायालयाच्या फौजदारी खटल्याबाबत.)
- **कलम 135 -** संघराज्यीय न्यायालयाच्या बाबतीत असणारे सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र.
- **कलम 136** - सर्वोच्च न्यायालयाद्वारे विशेष पुर्नविचार. सर्वोच्च न्यायालय स्वच्छेने भारतातील कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या फौजदारी, दिवाणी, घटनात्मक, महसुल विषयक निर्णयाविरुद्ध अपिल करण्याची संधी देवू शकेल.
- **कलम 137** - सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयाचे व आदेशाचे पुर्नविलोकन. सर्वोच्च न्यायालयाने आपले दिलेले पूर्वीचे निर्णय परत घेवून त्यात आवश्यक बदल करुन पुर्वीचा चुकीचा निर्णय दुरुस्त करुन नव्याने योग्य निर्णय देईल.
- **कलम 138** - सर्वोच्च न्यायालयातील अधिकार क्षेत्रातील विस्तार. संसद कायद्याद्वारे सर्वोच्च न्यायालयास संघसुचीतील कोणत्याही विषयासंबंधी अधिकार बहाल करु शकेल.
- **कलम 139** - सर्वोच्च न्यायालयास काही आदेश देण्याचा अधिकार. सर्वोच्च न्यायालयासमोर एक अधिक उच्च न्यायालयातील खटल्यामध्ये सारखाच प्रश्न प्रलंबित वाटत असेल तर सर्वोच्च न्यायालय तो खटला स्वतः कडे वर्ग करुन घेते.
- **कलम 140** - सर्वोच्च न्यायालयाचे अनुसंधित अधिकार.
- **कलम 141 -** सर्वोच्च न्यायालयाचे केलेला कायदा भारतातील सर्व भूप्रदेशावर बंधनकारक असेल.
- **कलम 142 -** सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाची अंमलबजावणी व शोध घेण्याबाबतचे आदेश.
- **कलम 143 -** सर्वोच्च न्यायालयाशी विचार-विनिमय करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार. राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाकडे एखाद्या कायद्याचा वस्तुस्थितीचा प्रश्न उपस्थित झाल्यास किंवा घटनेच्या प्रारंभानंतरही अंमलात राहिलेला कोणताही तह करार याबाबतचा उत्पन्न झालेला तंटा यासारख्या सार्वजनिक माहितीच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागतील. तो सल्ला देण्यास सर्वोच्च न्यायालयास बंधनकारक आहे.
- **कलम 144 -** नागरी आणि न्यायीक अधिकाराने सर्वोच्च न्यायालयाच्या सहकार्यासाठी कार्य करणे.
- **कलम 145 -** न्यायालयाचे नियम. राष्ट्रपतीच्या संमतीने संसद कायद्याच्या अधिन राहून सर्वोच्च न्यायालयास आपल्या कार्यपद्धतीचा नियम तयार करण्याचा अधिकार असेल.
- **कलम 146 -** सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी यांचा खर्च भारताच्या संचित निधीवर आधारित असेल.
- **कलम 147 -** अर्थ लावणे.
- **सर्वोच्च न्यायालयाचे कार्ये**

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

**1) प्रारंभिक अधिकार (कलम 131) -**

- जे खटले किंवा दावे फक्त आणि प्रथम सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर करावे लागतात त्या अधिकारास प्रारंभिक अधिकार म्हणतात.
  उदा. केंद्र - राज्य वाद.

**2) प्राधिलेख अधिकार (कलम 32) -**

- मुलभूत हक्काबाबत सर्वोच्च आणि उच्च न्यायालयामध्ये दाद मागता येते.

**3) अपिलाचे अधिकार (कलम 132) -**

- भारतातील उच्च न्यायालयाने दिवाणी आणि फौजदारी खटल्याबाबत निर्णय दिलेला असला तरीही परत सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करता येते.

**दिवाणी खटल्याबाबतचे अधिकार (कलम 133 )**

- उच्च न्यायालयातील एखाद्या खटल्यात कायदेविषयक प्रश्न निर्माण झाल्यास उच्च न्यायालय त्या प्रश्नांचे उत्तर सर्वोच्च न्यायालयाकडून मागवू शकते.

**फौजदारी खटल्याबाबतचे अधिकार (कलम 134)**

- उच्च न्यायालयाने एखाद्या आरोपीस मृत्युदंडाची शिक्षा दिलेली असेल तर तो आरोपी शिक्षा कमी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करु शकतो.

**4) सल्लादायी अधिकार (कलम 143) -**

- राष्ट्रपती वेळोवळी सर्वोच्च न्यायालयाकडे कायदे विषयक सल्ला मागू शकतात तो सल्ला सर्वोच्च न्यायालयाला राष्ट्रपतींना देणे बंधनकारक असते.
  उदा. बेरुबारी प्रकरण (1960), रामजन्म भूमी प्रकरण (1993)

**5) अभिलेख अधिकार (कलम 129) -**

- सर्वोच्च न्यायालय एखाद्या न्यायालयाने किंवा व्यक्तीने अपमान केल्यास त्यास अवमानाबद्दल शिक्षा सुनावते. (शिक्षा - 6 महिन्याची साधी कैद किंवा 2000 रु. दंड) त्यामुळे सर्वोच्च न्यायालयास अभिलेख न्यायालय म्हणुन ओळखले जाते.

**6) न्यायालयीन पुर्नविलोकनाचा अधिकार (कलम 13) -**

- संसद, राज्य विधीमंडळ व कार्यकारी मंडळाने तसेच राष्ट्रपती व राज्यपालाचे अध्यादेश यांची घटनात्मक वैद्यता तपासण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार म्हणजेच न्यायालयीन पुर्नविलोकन होय.

**7) इतर अधिकार -**

- **कलम 71 -** राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीतील वाद मिटविणे.
- **कलम 137 -** आपल्या निर्णयाचा पुर्नविचार करण्याचा अधिकार.
- **कलम 138 -** संसद कायद्याद्वारे संघसुचीतील अतिरिक्त अधिकार प्राप्त करण्याचा अधिकार.
- **कलम 139 -** उच्च न्यायालयातील काही खटले स्वतः कडे हस्तांतरण करण्याचा अधिकार.
- **कलम 141 -** सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय भारतातील सर्व न्यायालयांना बंधनकारक करण्याचा अधिकार.

**जनहितार्थ याचिका (Public Interest Litigation)**

- **संकल्पनेचा उदय -** 1980
- **जनक -** व्हि.आर. कृष्णा आय्यर.
- **अर्थ -** ज्या व्यक्तीवर अन्याय झाला असेल त्या व्यक्तीच्या वतीने इतरांना न्याय मागण्याचा अधिकार म्हणजेच जनहितार्थ याचिका होय.

**न्यायालयीन सक्रीयता (Judicial Activism)**

- **संकल्पनेचा उदय -** 1980
- **जनक -** पी.एन. भगवती
- **अर्थ -** समाजातील सर्वसामान्य प्रश्नावर निर्णय किंवा पुढाकार कार्यकारी किंवा कायदेमंडळाने घेण्याची अपेक्षा जनतेची असते. परंतु त्याऐवजी न्यायालयाकडून जनता ही अपेक्षा व्यक्त करत असेल तर त्यास न्यायालयीन सक्रीयता असे म्हणतात.